ISSN: 0973-9483

THE COMPASS

(Special Issue)
Vol. 12, No. 1, April 2019

National Seminar on Ethics in Higher Education

For Professional Development of Teachers

"We Galvanize Attitude"

BAHA'I ACADEMY

Sponsored by FDC (Under PMMMNMTT) UGC - HRDC of Savitribai Phule Pune University, Pune, in Collaboration With the Bahá'í Academy, Panchgani, Feb. 2019

2019

THE COMPASS

Special Issue

Vol. 12, No. 1,
April 2019

Actions and Reflections:
Proceedings of the
National Seminar
On
"Ethics in Higher Education
for Professional Development of Teachers"

Sponsored by the Faculty Development Centre
(Under PMMMNMTT) UGC-HRDC of
Savitribai Phule Pune University Pune
In Collaboration with the Bahá'í Academy, Panchgani
22-24 February 2019

The Magazine of the Bahá'í Academy,
An Institution Engaged in Research And Action in the Field of Value Education
for Institution of Higher Learning

Editors: *Mr. Lesan Azadi; Dr. Shashi Gaikwad*

Bahá'í Academy, 2019

The Bahá'í Academy
Shivajinagar, Panchgani- 412 805,
Maharashtra, India
www.bahaiacademy.org
thecompass@bahaiacademy.org

Table of Contents

Editorial 1

Messages

- Prof. Ram Takwale, President, I-CONSENT, Pune 3
- Prof. Vijay Bhatkar, Hon'ble Chancellor, Nalanda University, 4
- Prof. D. T. Shirke, Hon'ble Pro-Vice-Chancellor, Shivaji University, Kolhapur 5

Report of the Seminar 7

Keynote Addresses

- Prof. Arun Jamkar 13
- Dr. Vijay Bhadakwade 20
- Prof. Manikrao Salunkhe 22

Papers Presented

Social Media, Ethics and Youth In Higher Education 26
~ Asst. Prof. Vinodkumar Ashok Pradhan

Knowledge about Self & Ethics - A Solution to Achieve Sustainable Development Goals 32
~ Madhu Jagadeesh

Life Long Learning Skill from Nature & All – A Critical Skill for Humanity 43
~ Madhu Jagadeesh

छात्राध्यापकांमधील न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता मूल्यांचे स्पष्टीकरण: एक अभ्यास 54
~ कल्पना शिवाजी साळुंके

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बी.एड.अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या मूल्यशिक्षण विषयाचा प्राथमिक शिक्षकांना झालेल्या उपयुक्ततेचा अभ्यास 60
~ डॉ.कविता साळुंके, श्री.सचिन अशोक पोरे

Misuse of Social Media And Its Ill Effects on Academic Performance of The Students of S.M.B.T. College of Pharmacy 65
~ Amol S. Deshmukh, Pravin R. Dighe

मूल्यशिक्षण उपक्रमाद्वारे छात्रअध्यापकांचा जीवन कौशल्य रुजवणूकीचा अभ्यास 69
~ डॉ. कविता साळुंके, कु. ज्योती रामचंद्र लष्करी

Inculcation of Value-Based Education in B.Ed. Curriculum 78
~ Dr. Harsha Merchant

व्यावसायिक विकासात भावनिक बुद्धिमत्ता व व्यावसाय समाधानाची भूमिका: सहसंबंधात्मक अभ्यास 83
~ श्री. नितीन भिमराव ठाकरे, डॉ. संजीवनी महाले, श्रीमती विद्यादेवी बागुल, श्री. राहुल ढेरे

आदिवासी महिलांच्या शैक्षणिक सबलीकरणासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्रयत्न 92
~ डॉ. संजीवनी राजेश महाले, श्रीमती विद्यादेवी बागुल, श्री. राहुल ढेरे

उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यां समोरील नैतिक आव्हाने: एक अभ्यास 98
~ श्री. नवनाथ बोंबले

A Study of Personal and Social Impacts of Education in Human Rights and Human Values 102
~ Priti Shirke

आदिवासी महिलांच्या शैक्षणिक सबलीकरणासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्रयत्न

[1] डॉ. संजीवनी राजेश महाले, [2] श्रीमती विद्यादेवी बागुल, [3] श्री. राहुल ढेरे
[1] सहयोगी प्राध्यापक, [2, 3] पीएच.डी. संशोधक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
sanjivanirmahalegmail.com, vidyadevibagulgmail.com, rahuldhere11gmail.com

सारांश

भारताला स्वातंत्र्य मिळून जवळजवळ सत्तर वर्ष पूर्ण झालेले आहेत. आजही आदिवासी, डोंगराळ भागामधील महिलांना शिक्षणाच्या संधी फारश्या उपलब्ध नाहीत. शिक्षणाची इच्छा असूनही अनेक आदिवासी महिला शिक्षणापासून वंचित आहेत. विद्यापीठात आदिवासी महिलांसाठी कौशल्याधिष्ठीत प्रशिक्षण घेण्यात आले. त्यावेळी महिलांना मुक्त विद्यापीठातील शिक्षणाबाबत माहिती देण्यात आली. या महिलांना विनामूल्य प्रवेश देण्यासही मान्यता देण्यात आली. कार्यशाळेतील उपस्थित महिलांपैकी एकूण दोन तृतीयांश महिलांनी प्रवेश घेण्यासाठी नाव नोंदणी केली. ज्या महिला मुक्त विद्यापीठात प्रवेश घेवू इच्छित होत्या, त्यांना पुन्हा एक दिवस विद्यापीठातील शिक्षणपद्धतीबाबत अधिक माहिती देण्यासाठी बोलविण्यात आले. अर्धा दिवस मुक्त विद्यापीठ संकल्पना, स्वयं-अध्ययनाचे कसे शिकावे, संपर्कसत्र, समंत्रण संकल्पना समजावून सांगण्यात आल्या. त्यातील दोन महिला दहावी अनुत्तीर्ण होत्या. त्यांना पूर्वतयारीला प्रवेश देवून त्यांना पूर्वतयारीच्या विविध विषयांबाबत समंत्रण करण्यात आले. पूर्वतयारी परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येते. त्यांनी कधीही संगणकाला हात लावलेला नव्हता म्हणून त्यांना संगणकाचा परिचय करून देण्यात आला. ऑनलाईन परीक्षेचा सराव करून घेण्यात आला. बहुपर्यायी प्रश्नांचे अचूक पर्याय कसे निवडावेत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्या दोन्ही महिला पूर्वतयारी शिक्षणक्रमाची परीक्षा उत्तीर्ण झाल्या, त्यांना लगेचच इतर महिलांबरोबरच एम .वाय.बी.ए. ला प्रवेश देण्यात आला.

या महिला विविध आदिवासी भागातील आहेत. त्यांना दर आठवड्याला संपर्क सत्राला येणे शक्य नाही, त्यामुळे दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी संपर्कसत्र घेण्यात येतात. समंत्रक म्हणून विद्यापीठातील प्राध्यापक आणि पीएच.डी. विद्यार्थी कार्य करतात. प्रत्येक विषयातील विविध घटकांची विभागणी चार तासिकांमध्ये करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांचा आणि समंत्रकांचा व्हॉट्सअॅप ग्रुप करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे राहण्याच्या ठिकाणानुसारही उपगट करून त्यांना अभ्यासाला मार्गदर्शन केले जाते. आदिवासी महिलांना उच्च शिक्षणात टिकवून ठेवण्यासाठी लवचीकतेचा वापर करण्यात येत आहे.

मुख्य संकल्पना: आदिवासी महिला, शैक्षणिक सबलीकरण

प्रस्तावना

भारत देशाचे विविधता हे वैशिष्ट्य आहे. आपल्याला ही विविधता धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक तसेच भौगोलिक दृष्ट्या दिसून येते. राज्यानुसार भौगोलिक रचनेत फरक आहे. महाराष्ट्रातही नंदुरबारसारखे संपूर्ण आदिवासी जिल्हे तर नाशिक सारख्या जिल्ह्यांमध्ये सात-आठ तालुक्यात आदिवासी राहतात. या आदिवासींचा निवारा हा डोंगराळ भागात आहे, त्यामुळे त्यांची रचना छोट्या-छोट्या पाडयांसारखी आहेत. या पाडयांवर व्यक्तींना शिक्षणाच्या संधी फारश्या उपलब्ध नाही. त्यांचा जीवन चरितार्थ जंगलातील नैसर्गिक साधन सामग्रीवर अवलंबून असल्यामुळे ते शिक्षणाला फारसे महत्त्व देत नाही. हे लोक आजही विकासात मागे दिसून येतात. यात केवळ पुरुषांचा विचार न करता स्त्रीयांचा देखील विचार करणे आवश्यक आहे. कारण प्रत्येक

विकसित समाजात स्त्री व पुरुष या दोघांची समान गरज असते. महिला सबलीकरणासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य स्तरावर खूप मोठ्या प्रमाणात प्रयत्न चालू आहेत. महिलांच्या शैक्षणिक सबलीकरणासाठी शिक्षण हेच अधिकाधिक महत्त्वाचे व मूलभूत साधन मानले जाते. महिलांना सुशिक्षित समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. महिला सुशिक्षित झाल्याशिवाय कोणत्याही समाजातील लोक शिक्षित होवू शकत नाही असे विविध आयोग आणि समित्यांनी मांडलेले आहे. नरवणे, मी.(१९९९) यावरून उदृधृत.

महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले, तर दुसरे २००१ आणि २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित करण्यात आले आहे. भारतातील शैक्षणिक नियोजनकर्त्यांनी स्त्री व पुरुष यांच्यामधील दरी कमी करण्याकरिता रणनीती ठरविली. १९५० मध्ये या कार्यक्रमाचा दृष्टीकोन 'कल्याण' हा होता तर १९७० च्या सुमारास 'विकास' हा झाला व १९९० पासून सबलीकरण' हा दृष्टीकोन झाला. (तवंदकर २०१६)

संशोधनाची महत्त्व/ संबंधित साहित्य आढावा

निर्णयक्षमता, आर्थिक प्रगती आणि सबलीकरण हे तीन घटक एकमेकांशी संबंधित आहे. देशातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रगतीमध्ये महिलांची भूमिका महत्त्वाची आहे. महिला व्यावसायिकांनी जगातील आर्थिक व्यवस्थेत भर घालून नवीन रोजगार उपलब्ध केलेले आहेत. शाश्वत विकासामध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. गोला (२०१०) यांच्या मते महिला योग्य कामे अधिक अचूकतेने करतात. महिलांचा आर्थिक स्तर उंचावल्यास मुलांचे आरोग्य, आहार आणि शिक्षणाला दिशा मिळते. प्रत्येक देशातील महिला आर्थिक, सामाजिक शास्त्रज्ञ, अर्थ तज्ज्ञ आणि निर्णय क्षमतेत महत्त्वाची भूमिका बजावतात. अकपुनोनी, यु. (२०१९) यावरून उदृधृत. जगातील बँकेनेही सुक्ष्म लघुउद्योग आणि कृषी संदर्भातील कृतींमध्ये महिलांचा सहभाग जास्त आहे असे नमूद केले आहे. महिलांना कौशल्याधिष्ठित प्रशिक्षण दिल्यास उत्पादन क्षमता आणि गुणवत्ता, नाविन्यपूर्ण कामात वाढ होते आणि त्यातून गरिबी कमी होण्यास मदत होते. त्यांच्या उपजीविकेच्या साधनात वाढ होते. भारतीय संविधानातील आर्टिकल २० आणि ४६ मध्ये गरीब समाजाच्या शैक्षणिक आणि आर्थिक घटकांबाबत सक्षम करण्यासाठी मार्गदर्शन केलेले आहे. शासकीय, अशासकीय पातळीवर अनेक प्रयत्न होत आहेत. परंतु ते शालेय विद्यार्थ्यांसंदर्भात आहे. आदिवासी महिला नियमित पद्धतीने शिक्षण घेऊ शकत नाही. त्यांना काम करता करता शिक्षण कसे देता येईल? त्यांच्यात अभ्यासूवृत्ती कशी विकसित करता येईल ? अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत लवचिकता कशी आणता येईल ? ह्याचा विचार करून संशोधन हाती घेण्यात आले.

संशोधन शीर्षक – आदिवासी महिलांच्या शैक्षणिक सबलीकरणासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्रयत्न

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. आदिवासी महिलांच्या शैक्षणिक आवडीबाबतचा अभ्यास करणे.
२. आदिवासी महिलांना मुक्त विद्यापीठातून शिकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध संकल्पनांच्या माहितीबाबतचा अभ्यास करणे.
३. शिक्षणक्रमनिहाय प्रवेशित आदिवासी महिलांच्या शिक्षणक्रमास प्रवेश घेण्याच्या हेतूंचा अभ्यास करणे.
४. संपर्कसत्रातून समंत्रकांकडून आदिवासी महिलांच्या असलेल्या अपेक्षांचा अभ्यास करणे.
५. बारावी अनुत्तीर्ण आदिवासी महिलांना पूर्वतयारी शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी कृतियोजना विकसित करणे.

कार्यात्मक व्याख्या

आदिवासी महिला- ज्या महिला ग्रामीण भागातील डोंगराळ भागात राहतात. त्यांच्यापर्यंत आधुनिक शिक्षण, इलेक्ट्रीसिटी, शुध्द पिण्याचे पाणी, आरोग्य आणि पुरेशी वाहतूक सुविधा उपलब्ध नाहीत.

शैक्षणिक सबलीकरण- शिक्षणातील खंड क्षमापित करून त्यांना शिक्षणाच्या संधी त्यांच्या क्षमतेनुसार, सोयीनुसार त्याना शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.

संशोधन व्याप्ती व मर्यादा-

व्याप्ती- १. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी महिलांसाठी होती.
२. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी होती.
३. आदिवासी महिलांच्या गरजेनुसार मुक्त विद्यापीठातील विविध शिक्षणक्रमाच्या प्रवेशासंबंधित होती.

मर्यादा- १. हरसूल, गिरणारे आणि दिंडोरी तालुक्यातील आदिवासी महिलांपुरतेच मर्यादित आहे.
२. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील तुकडीसाठी मर्यादित आहे.
३. मुक्त विद्यापीठातील बी.ए. आणि एम.ए. शिक्षणक्रमापुरते मर्यादित होते.

संशोधनाचे महत्त्व

कोणत्याही देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रगतीसाठी महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महिलांच्या शिक्षणासाठी पर्यावरणीय घटक महत्त्वाचा ठरतो. आदिवासी भागात शिक्षणाच्या संधी फारश्या उपलब्ध नसल्यामुळे या महिला उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत. त्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणल्यास त्यांना ज्ञान प्राप्त होईल. त्याचप्रमाणे देशाच्या प्रगतीसाठी शिक्षणाचे महत्त्व लक्षात आल्यानतंर त्या आदिवासी पाडयातील इतरांनाही शिक्षणासाठी प्रवृत्त करतील आणि त्यातूनच इतर आदिवासी महिला शिक्षित होतील. देशाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक शाश्वत विकासाला त्यांचा हातभार लागेल.

संशोधन पद्धती – सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला.

संशोधनाची साधने- प्रस्तुत संशोधनासाठी अनौपचारिक मुलाखत, निरीक्षण आणि प्रश्नावली या साधनांचा वापर करण्यात आला.

अनौपचारिक मुलाखत – कौशल्याधिष्ठित कार्यशाळेसाठी आलेल्या महिला विद्यापीठात निवासी होत्या. रात्री या महिलांच्या शिक्षण अपूर्ण राहण्याची कारणे कोणती त्याचप्रमाणे मुक्त विद्यापीठात त्यांना प्रवेश मिळाल्यास त्या शिक्षण घेऊ इच्छितात का या बाबत अनौपचारिक मुलाखतीद्वारे त्यांच्या नकळत त्यांना शिक्षणाबाबत असलेली जाणींव जागृती, शिक्षण घेण्याची तयारी इत्यादी घटकांचा शोध घेण्यात आला.

निरीक्षण – बी.ए. प्रथम आणि द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनीची वैशिष्टे भिन्न भिन्न होती. त्यातील काही महिला प्रथमच शहरात आलेल्या होत्या विद्यापीठात उच्च शिक्षण घ्यावयाचे म्हणून त्यांच्यावर एकप्रकारचे दडपण होते. त्यामुळे निरीक्षणही असंरचित करावयाचे असे ठरविण्यात आले. निरीक्षणात पुढील नोंदी घ्यावयाच्या हे निश्चित करण्यात आले. त्यांची अभ्यास पध्दती, एकमेकींना समजून घेण्याची क्षमता, समंत्रकांशी होत असलेला संवाद आणि एकूणच विषय ज्ञानाचे दैनंदिन जीवनात कसे उपयोजन करता येईल याबाबतच्या विचारप्रक्रियेचे निरीक्षण करण्यात आले.

प्रश्नावली – प्रश्नावलीमधून त्यांची वैयक्तिक माहिती घेऊन त्यांना पदवीधर का व्हावसे वाटते, याबाबत प्रश्न विचारण्यात आले. संपर्क सत्रामध्ये विविध कृती केल्या जात होत्या. समंत्रकही विषयाच्या गरजेनुसार आणि विद्यार्थ्यांच्या कुवतीनुसार समंत्रणाच्या स्वरुपात बदल करत होते. विद्यार्थिनी इतर विद्यार्थिनींच्या सहायाने आशय आकलन कसे करावे याबाबतही प्रश्न विचारण्यात आलेले होते.

सामग्री एकत्रीकरण आणि विश्लेषण

आदिवासी महिलांसाठी महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी संपूर्ण दिवस संपर्क सत्र घेण्यात आले. त्यावे सामग्री औपचारिक आणि अनौपचारिक रित्या एकत्र करण्यात आली. महिलांची संख्या केवळ ०७ असल्यामुळे कोणतेही

संख्याशास्त्रीय तंत्र वापरता येत नव्हते. म्हणून फक्त टक्केवारीचा वापर करून माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

निष्कर्ष

उद्दिष्ट क्र. १) आदिवासी महिलांच्या शैक्षणिक आवडीबाबतचा अभ्यास करणे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी महिलांसाठी कौशल्याधिष्ठीत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या महिलांच्या कौशल्य विकसनासाठी विविध कौशल्याधिष्ठीत कृतींच्या प्रशिक्षणांचे आयोजन केले होते. यातील ५० % महिला प्रथम: शहरात आलेल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या मनावर ताण होता. त्यांचे स्वागत आणि विविध कृतीयुक्त सहभागातून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. या कार्यशाळेत महिलांच्या कायदेविषयक तरतुदींचे देखील व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यात तज्ज्ञांनी आदिवासी महिलांनी शिक्षणासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेश घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानुसार विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन आणि विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक यांनी या महिलांना मोफत उच्च शिक्षणाची संधी प्रवेश प्रक्रियेचा कालावधी संपलेला होता तरी विशेष बाब म्हणून उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली. कार्यशाळेत समाविष्ट झालेल्या एकूण ६२ पैकी २१ महिलांनी उच्च शिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त केली होती व नाव नोंदणी केली. त्यातील १५ 'हिलांनी बारावी उत्तीर्ण नसल्यामुळे पूर्वतयारी शिक्षणक्रमासाठी आणि ६ महिला पदवीसाठी प्रवेश घेऊ इच्छित होत्या. महिलांच्या अनौपचारिक मुलाखती घेऊन त्यांना पदवीधर व्हावयाची इच्छा होती म्हणून बी.ए. शिक्षणक्रमाला प्रवेश निश्चित करण्यात आला.

उद्दिष्ट क्र. २) आदिवासी महिलांना मुक्त विद्यापीठातून शिकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध संकल्पनांच्या माहिती बाबतचा अभ्यास करणे. मुक्त विद्यापीठातून शिक्षण कसे दिले जाते याबाबत त्यांना माहिती आहे का ? हे जाणून घेण्यासाठी त्यांना काही प्रश्न विचारण्यात आले मुक्त विद्यापीठात कोणाला प्रवेश दिला जातो ? मुक्त विद्यापीठाच्या प्रवेशाबाबत तुम्हाला माहिती आहे का ? विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी कसे मार्गदर्शन केले जाते ? त्यांची उत्तरे पुढीलप्रमाणे १. सर्वच महिलांचा शिक्षणात खंड पडलेला होता. अशा व्यक्तींना (प्रौढांना) तरी मुक्त विद्यापीठात शिक्षण घेता येते हे माहिती नव्हते. विद्यापीठाची प्रवेशाबाबतची प्रसिद्धी त्यांच्या निदर्शनास आलेली नव्हती. मुक्त विद्यापीठात अध्ययन - अध्यापन प्रक्रिया कशी चालते हे ही त्यांना माहिती नव्हते. प्रशिक्षण कार्यशाळेनंतर एक दिवस प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या महिलांना विद्यापीठात बोलविण्यात आले. मुक्त विद्यापीठाद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षण पध्दतीचा परिचय करून देण्यात आला. एम . वाय. बी. ए. शिक्षणक्रमाबाबत सविस्तर माहिती त्यांना देण्यात आली. स्वयं-अध्ययन साहित्याचा वापर करून स्वत: शिक्षक आणि विद्यार्थी बनून कसे शिकावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. इतर साहित्यापेक्षा स्वयं-अध्ययन साहित्याची मांडणी वेगळी आहे. त्याची माहिती देण्यात आली. पानावरील मोठ्या समासात समजलेले व न समजलेले मुद्दे कसे नोंदवावेत ह्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

उद्दिष्ट क्र. ३) शिक्षणक्रमनिहाय प्रवेशित महिलांच्या शिक्षणक्रमास प्रवेश घेण्याच्या हेतूंचा अभ्यास करणे.

कोष्टक क्र. १ आदिवासी महिलांचा उच्च शिक्षण घेण्यामागचा हेतू दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	हेतू	प्रतिसादक	टक्केवारी
१	पदवीधर होण्याची इच्छा	४	४०%
२	ज्ञान प्राप्तीची इच्छा	५	५६%
३	समाजात मान/ प्रतिष्ठा मिळविण्याची इच्छा	२	२२%
४	घरातील मुलांना मार्गदर्शन करण्याची इच्छा	७	७८%
५	नोकरी करण्याची इच्छा	७	७८%
६	अन्य कारणे	.	घरातील व्यक्तींकडून मान-सन्मान मिळण्यासाठी

अन्वयार्थ – मुक्त विद्यापीठात प्रवेश घेण्यामागील हेतूंचा शोध घेण्यासाठी त्यांना विविध पर्याय देण्यात आलेले होते. आदिवासी महिलांनाही एकापेक्षा जास्त पर्याय निवडण्याची संधी होती. नोकरी करण्यासाठी आणि घरातील मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी ७८ % महिलांनी प्रवेश घेतला होता. ज्ञानप्राप्तीसाठी ५६ % महिलांनी तर पदवीधर होण्यासाठी ४०% महिलांनी प्रवेश घेतला होता. शिक्षित झाल्यानंतर घरात व समाजात मन / प्रतिष्ठा मिळविण्यासाठी प्रवेश घेणाऱ्या महिलांची संख्या २२ % होती.

निष्कर्ष –

१. आदिवासी महिलांना उच्च शिक्षणात प्रवेश घेण्याच्या हेतूमध्ये विविधता होती.
२. आदिवासी महिलांनी नोकरी आणि घरातील मुलांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्यासाठी पदवीधर शिक्षणक्रमास प्रवेश घेतलेला होता.
३. ज्ञान प्राप्तीसाठी निम्म्यापेक्षा जास्त महिलांनी प्रवेश घेतला होता.
४. घरातील आणि सामाजिक प्रतिष्ठेसाठी शिक्षण घेणाऱ्या महिलांची संख्या कमी होती.

उद्दिष्ट क्र. ४) बारावी अनुत्तीर्ण आदिवासी महिलांना पूर्वतयारी शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी कृतियोजना विकसित करणे.

सामान्य: जे विद्यार्थी बारावी उत्तीर्ण होत नाहीत त्यांना महाविद्यालय अथवा विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश दिला जात नाही. पण यशंवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने विद्यार्थ्यांची ही अडचण दूर केली आहे. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून दूर झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधीच आहे. आदिवासी महिलांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महिलांना पूर्वतयारी शिक्षणक्रमासाठी विनामूल्य प्रवेश देण्यात आला. पंधरा आदिवासी महिलांपैकी प्रत्यक्षात फक्त दोन महिलांनी पूर्वतयारी शिक्षणक्रमासाठी ऑनलाईन प्रवेश घेतला. पूर्वतयारी शिक्षणक्रमातील तीन विषयांचा परिचय करून देणे गरजेचे होते त्यासाठी त्यांना पूर्वतयारी शिक्षणक्रमाचे पुस्तके घरी अभ्यास करण्यासाठी देण्यात आले. त्यातील विषयांची नावे अशी होती. १. मूलभूत अध्ययन कौशल्ये, २. मूलभूत भाषा कौशल्ये आणि ३. सर्वांसाठी गणित.

तीन विषयांच्या अभ्यासामुळे आदिवासी महिलांना अभ्यासाच्या विविध घटकांचे आकलन झाले. भाषेचे वेगवेगळे आयाम समजले. दैनंदिन जीवनात आवश्यक असणारे गणिती कौशल्यांची प्राप्ती अपेक्षित आहे. दोन महिलांसाठी विद्यापीठातील प्राध्यापक आणि पीएच.डी. संशोधाकांमार्फत एक दिवस एक-एक तासाचे संमंत्रण करण्यात आले. संगणकाचा परिचय करून देण्यात आला व त्यांना संगणक हाताळण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. पूर्वतयारीची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येते. परीक्षेसाठी एक तास देण्यात येतो. ५० बहुपर्यायी प्रश्न असतात. प्रत्येक प्रश्नांसाठी चार पर्याय दिलेले असतात. एका प्रश्नासाठी दोन गुण असतात. अशा स्वरूपाच्या परीक्षेचा सराव त्यांना देण्यात आला. बहुपर्यायी प्रश्नातील अचूक पर्यायाची निवड कशी करावयाची याबाबत मार्गदर्शन केले. संमंत्रण सत्र पूर्ण झाल्यानंतर महिलांनी परीक्षा केंद्रावर जावून ऑनलाईन परीक्षा आत्मविश्वासाने दिली त्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्या. त्यातूनच त्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी उत्सुकता निर्माण झाली.

निष्कर्ष – विद्यापीठामार्फत पूर्वतयारी शिक्षणक्रमासाठी संमंत्रण, संगणक परिचय, ऑनलाईन परीक्षा या प्रकारची पूर्वतयारी केल्यामुळे आदिवासी महिला मुक्त विद्यापीठाचा पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण झाल्या.

उद्दिष्ट क्र ५) संपर्कसत्रातून समंत्रकांकडून आदिवासी महिलांना असलेल्या अपेक्षांचा अभ्यास करणे.

कोष्टक क्र.२ संपर्कसत्रातून समंत्रकांकडून विद्यार्थिनींच्या अपेक्षा दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	अपेक्षा	प्रतिसादक	टक्केवारी
१	पुस्तकाची ओळख / परिचय	२	२२%
२	अभ्यास कसा करावा ह्याबाबत माहिती	८	८९%
३	अभ्यास वेळापत्रकाबाबत मार्गदर्शक	५	५६%
४	अभ्यास लेखनाबाबत मार्गदर्शन	५	५६%
५	इतर विद्यार्थिनी सोबत अभ्यास कसा करावा याबाबत माहिती / सहाध्ययनाबाबत माहिती	२	२२%
६	पुढील संपर्क सत्र वेळापत्रक	३	३३%
७	इतर अभ्यास	-	-

अर्थनिर्वचन – ८९ % आदिवासी महिलांना अभ्यास कसा करावा याबाबत मार्गदर्शन अपेक्षित होते. ५६% महिलांना अभ्यास वेळापत्रक आणि लेखनाबाबत मार्गदर्शन अपेक्षित होते.

निष्कर्ष –

१. आदिवासी महिलांचा शिक्षणात खंड होता त्यामुळे अभ्यास कसा करावा याबाबत प्रामुख्याने मार्गदर्शन अपेक्षित होते.

२. दैनंदिन कामे सांभाळून अभ्यासाचे वेळापत्रक तयार करण्यासाठी मार्गदर्शन आवश्यक होते.

३. आदिवासी महिलांचा लेखनाशी संबंध नाही परंतु शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी लेखन अत्यावश्यक आहे. त्याबाबतही त्यांची मार्गदर्शनाची अपेक्षा आहे.

सारांश– आदिवासी महिलांच्या सबलीकरणासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर विविध शासकीय व अशासकीय संस्थांमार्फत प्रयत्न केले जात आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने आदिवासी महिलांच्या शैक्षणिक सबलीकरणासाठी आपल्या प्रणालीत लवचिकता आणून प्रयत्न केले आहेत. अभ्यासांती असे लक्षात येते की, आदिवासी महिलांनाही शिक्षणाची संधी उपलब्ध झाल्यास त्यांचा आर्थिक स्तर तर उंचावतोच त्याचबरोबर त्यांना स्वत:ला सिद्ध करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांचे समाजात एक स्थान निर्माण होते.

संदर्भ –

१. साळुंके, क., महाले, सं. (२०१८), आदिवासी महिलांसाठी कौशल्याधिष्ठित कार्यशाळा, अप्रकाशित अहवाल

2. kpunoun U.E. Sussan M.U. (2015), Women entrepreneurship as an Inventive approach to Ensure A Sustainable Development in Developing Economies. International Journal of Emerging Technology and Advanced Engineering Volume 5, Special Issue 1, Jan 2015 (https://www.researchgate.net/publication/32406381%)

३. पूर्वतयारी शिक्षणक्रम – मूलभूत अध्ययन कौशल्ये, मूलभूत भाषा कौशल्ये, सर्वांसाठी गणित, कुलसचिव य.च.म.मु.विद्यापीठ,नाशिक.

४. पूर्वतयारी आणि बी.ए. शिक्षणक्रम माहिती पुस्तिका, कुलसचिव य.च.म.मु.विद्यापीठ,नाशिक.

५. नरवणे, मी. (१९९९), भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.

६. तवंतकर, सुरेखा (२०१६), महिलांचे हक्क आणि सबलीकरणांच्या योजना-उपाय, योजना मासिक, सप्टेंबर, २०१६.

(मा. कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन यांनी आदिवासी महिलांच्या सन २०१८-१९ या वर्षासाठी बी.ए. प्रथम व द्वितीय वर्ष प्रवेशास मान्यता दिल्यामुळे आम्ही हे कार्य करू शकलो. म्हणून निबंध लेखक माननीय कुलगुरूंच्या ऋणात राहू इच्छितो.)